# दिनांक 04/04/2025

**1** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे 02/04/2025 रोजी 20:30 वा ते दि. 03/04/2025 रोजी 20:30 वा च्या दरम्यान मौजे ढालकाठी गावचे हददीत चंद्रनारायण बिल्डींग, महाड-दापोली रोडजवळ ता.महाड येथे फिर्यादी रा.चंद्रनारायण बिल्डींग, महाड-दापोली रोडजवळ, ढालकाठी, ता.महाड यांनी त्यांच्या ताब्यातील बुलेट मोटारसायकल क्र.एम.एच.08.ऐ.जे.3603 ही मौजे ढालकाठी गावचे हददीत चंद्रनारायण बिल्डींगच्या जवळ उभी केली होती. कोणीतरी अज्ञात चोरटयाने सदर बुलेट ही फिर्यादी यांचे परवानगी शिवाय स्वतःच्या फायद्याकरिता लबाडीच्या हेतुने चोरुन नेली.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.37/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/भरत घुले हे करीत आहेत.

**2**. श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 29/03/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे कोलमांडला येथील फिर्यादी यांचे बागेमध्ये श्रीवर्धन फिर्यादी हे वडाळा येथे असताना त्यांना साक्षीदार यांनी कळविले की, 02 आरोपित हे विना परवाना आंब्यांच्या बागेत घुसून बाजुस 28,000/-रुपये किंमतीचे आंबे फिर्यादी यांचे बागेतुन चोरून नेले.

याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे गुरनं.24/2025 भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2), 329 (3),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्रीकांत काळे हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/01/2025 रोजी 17:00 वा ते दि. 29/01/2025 रोजी 17:00 वा च्या दरम्यान मौजे निर्माणनगर येथील फिर्यादी यांचा दुर्गानिलय बंगल्यामध्ये ता. कर्जत, येथे कोणीतरी अज्ञात चोराने अगर चोरटयांनी फिर्यादी यांचे मालकीच्या दुर्गानिलय बंगल्याचे लोखंडी ग्रिल तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन बाजुस 17,000/-रुपये किंमतीच्या वस्तु चोरुन नेले.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.55/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 305 a,331(3)]331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/किसवे हे करीत आहेत.

**4**. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 00:00 वा ते दि.01/04/2025 रोजी

00:00 वा च्या दरम्यान मौजे हेटवणे प्रकल्प उपविभाग क्रमांक 5 कामार्ली येथील वसाहतीतील रुममध्ये ता.पेण येथे एकूण 15,750/-रुपये किमंतीचे डॅमचे बांधकाम व लेव्हल चेक करणेकरीता लागणारे जुने साहित्य कोणीतरी अज्ञात इसम याने फिर्यादीच्या संमतीशिवाय स्वत:चे फायदया करिता घरुफोडी चोरी केले.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.60/2025, भा.न्या.सं.2023 कलम 331(3),331(4), 305(e) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/पाटील हे करीत आहेत.

**5**. दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/04/2025 रोजी 14:00 वा ते दि. 02/04/2025 रोजी 14:00 वा मौजे कोपर फाटा येथे फिर्यादी रा.बळवली पेण यांचे सोयरे यांचे घरामध्ये ता.पेण आरोपीत यांनी फिर्यादी व फिर्यादी यांचे सोयरे यांचा पॅरेलेसचे आजार पुर्णपणे बरा करतो असे सांगून फिर्यादी यांचे विश्वास संपादन करुन त्यांना खोटयानाटया विधी करुन त्यांचे गळयातील सोन्याची चैन त्यामध्ये बदामाचे आकाराचा पान व फिर्यादी यांची सोयरी यांचे कानातील दोन सोन्याच्या साखळया,सोन्याची एक डवली व दोन सोन्याची मणी असा एकूण 90,000/-रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेवून त्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणूक केली.

याबाबत दादर सागरी पोलीस ठाणे गुरनं.13/2025, भारतीय न्याय संहिता कलम 2023 कलम 318(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/पाटील हे करीत आहेत.

**6**. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 07:00 वा ते दि.01/04/2025 रोजी 07:00 वा च्या दरम्यान मौजे परळी येथील फिर्यादी यांचे राहते घराचे कपाटातुन 1,25,000/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हे मौजे परळी येथील राहते घराचे दरम्यान आरोपी रा.उबंरवाडी पाली खोपोली रोड माणगाव बू.ता.सूधागड त्याचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुने स्वत:चे फायदयाकरीता चोरून नेले आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 03/04/2025 रोजी 20:12 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.33/2025, BNNS 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/सूर्यवंशी हे करीत आहेत.

**7.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे बिर्ला कंपनी मध्ये एमआयडीसी ता.महाड येथे आरोपीत रा.महाड याने बिर्ला कांपनी वे मेन गेट मधुन आत प्रवेश करून कंपनीचे काम थांबवुन कंपनीमध्ये असलेले साई सिध्दी असोशियट(माथाडी कामगार) यांचा मॅनेजर फिर्यादी रा.पुणे सध्या रा.नागळवाडी ता.महाड यांच्याशी कांपनीतील काम मिळण्यावरुन बाचाबाची व धक्का बुकी करुन शिवीगाळी व दमदाटी केली.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.38/2025, भारतीय न्याय संहिता 329,126(2),115(2),352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास

पोह/प्रवीण राठोड हे करीत आहेत.

**8.** महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे शिरवली महाडीक कोंड ता.महाड येथे फिर्यादी रा.शिरवली महाडीक कोंड ता.महाड व साक्षीदार हे पाण्याचे वॉल्व बसविण्याचे काम करत असताना आरोपीत रा.शिरवली महाडीक कोंड हा तेथे आला व त्याने फिर्यादीस शिवीगाळी करून वॉल्व बसवायचाय तर तो माझे भात गिरणीचे साईडला बसवा असे सांगितले परंतु त्याचे म्हणणे फिर्यादीने ऐकले नाही त्यामुळे त्या गोष्टीचा आरोपीत याने मनात राग धरून फिर्यादीस शिवीगाळी करून म्हणला की तुम्ही लोक इथे वॉल्वचे काम करू नका नायतर मी एकेकाला जीवे मारीन अशी धमकी साक्षीदार याचे समोर दिली व कामाकरीता असलेला फावडा आरोपीने हातात घेउन फिर्यादीचे डोक्यावर मारून डावे डोळयाचे आखावर दुखापत केली आहे.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं.16/2025, 118 (1),352,351(2), बी.एन.एस कलम 118 (1),352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/राजेश जाधव हे करीत आहेत.

**9**. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे परहुरपाडा, ता.अलिबाग येथे फिर्यादी रा.परहुरपाडा, पो.कामार्ले, ता.अलिबाग हे घराचे बाजुला असलेल्या शेवग्याच्या झाडाच्या शेंगा काढत असताना आरोपीत यांनी फिर्यादी हे शेंगा काढत असल्याचा फोटो त्याचे मोबाईल मध्ये घेत असल्याचे फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नीने यांनी पाहिले म्हणुन फिर्यादीने विचारणा केली असता आरोपीत यांनी फिर्यादी व फिर्यादी यांची पत्नी यास शिवीगाळी केली व फिर्यादी यांचे अंगावर येवुन हातातील कोयता फिर्यादी यांचे डाव्या हाताच्या खांदयावर मारून दुखापत केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं 61/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),351(2),351(3) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/पाटील हे करीत आहेत.

**10.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे 02/04/2025 रोजी 10:00 वा ते दि. 03/04/2025 रोजी 10:00 वा च्या दरम्यान मौजे नांगलवाडी गावचे हददीत अरूणनगर सोसायटी बिल्डींगचे आवारात महाड येथे यांच्या मालकीची एकूण 4,00,000/- रुपये किमतीची मारूती कंपनीची ईको व्हॅन गाडी नं एम एच 06 बीयू 7493 ही ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात ईसमाने खबर देणार यांचे परवानगीशिवाय स्वताचे फायदयाकरता लबाडीच्या हेतूने चोरून नेली.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.39/2025, भारतीय न्याय संहिता 2023 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/भरत घुले हे करीत आहेत.

**11.** वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/01/2025 रोजी 21:00 वा ते दि. 03/04/2025 रोजी 21:00 वा च्या दरम्यान मौजे अलिबाग ते धरमतरच्या रोडवरील हायवे गोमांतक हॉटेल

शेजारी, डिल्लु सिंगच्या दृष्टी इंजिनियरींग गॅरेज समोरून ता पेण येथे फिर्यादी व साक्षीदार यांची दृष्टी इंजिनियरींग गॅरेज मध्ये कामाला दिलेल्या एकूण 5,00,000/-रुपये किंमतीच्या पोकलन मशिनच्या बकेट कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करून नेल्या.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गुरनं.33/2025, BNS 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/चव्हाण हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 03.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 347 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,65,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.